## प्रकरण पहिले

# इचलकरंजीच्या वस्त्रोद्योगाची
# ऐतिहासिक पार्श्वभूमि.

इचलकरंजी हे गांव कोल्हापूर-मिरज रेल्वेमार्गावर मध्यस्थानी आहे. आणि हातकणंगले या रेल्वे स्टेशन व तालुक्याच्या ठिकाणापासून ९.६ कि.मी. अंतरावर आहे. इचलकरंजी हे कोल्हापूरपासून २९ कि.मी.अंतरावर आहे. जिल्ह्यातील हे एक महत्वाचे ठिकाण असून ते कोल्हापूर व सांगली या जिल्ह्यांच्या ठिकाणांशी व हातकणंगले या तालुक्याशी वाहतुकीच्या मार्गांनी जोडले आहे.

यंत्रमागावर सुती कापडाचे उत्पादन करणारे इचलकरंजी हे सर्वात मोठे औद्योगिक केंद्र आहे. इचलकरंजीचा विस्तार १६.४०$^{0}$ उत्तर अक्षांश आणि ७४.३२$^{0}$ पूर्व रेखांश आहे. इचलकरंजी हे शहर पंचगंगा नदीच्या खो-यात वसले असून पंचगंगा नदीपासून १.६ कि.मी. अंतरावर आहे. हे गांव सात वाडयांपासून बनले आहे असे म्हटले जाते[१]

नगरपालिकेच्या अखत्यारित २,३०८ हेक्टर जमिन आहे. पर्जन्य छायेच्या प्रदेशात हे शहर वसले आहे. आणि तुलनात्मक दृष्टीने कोरडे [दमट] हवामान असून मध्यम पर्जन्यवृष्टी होते. कमाल व किमान तपमानातील अंतर तुलनात्मकदृष्टया कमी आहे. उन्हाळ्यातील कमाल तपमान ४०$^{0}$सें. आणि हिवाळ्यातील किमान तपमान क्वचितच १०$^{0}$ सें.पेक्षा कमी असते.[२]

मुंबई राज्यात समाविष्ट होण्यापूर्वी इचलकरंजी हे कोल्हापूर संस्थानातील आकरा महत्वाच्या सरंजामी जहागिरीपैकी एक जहागीर होती. १ मार्च १९४९ रोजी इचलकरंजी जहागीर मुंबई राज्यात समाविष्ट झाली. परंतु त्याआधी इचलकरंजी हे "स्वतंत्र राज्य" किंवा"कोल्हापूर संस्थानची जहागिर" याबद्दलचा स्पष्ट निर्णय नव्हता. त्यामुळे इचलकरंजी ही कोल्हापूर संस्थानातील एक जहागीर म्हणूनच गणली गेली.[३]

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

इचलकरंजी खेड्याच्या इतिहासावरून व त्याच्या कोल्हापूर संस्थानिकांशी झालेल्या संघर्षावरून ते खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

"एका ब्राम्हण कारकुनाने इचलकरंजी वसवली. त्याचे नांव नारो महादेव. कापशीच्या सेनापतींच्या पूर्वजांच्या सेवेत ते होते. त्यांनी नारो महादेवांना "इचलकरंजी" खेडे इनाम म्हणून दिले. आपल्या धन्याचे "घोरपडे" हे नांव या कुटुंबाने स्विकारले. नारो महादेवांच्या सत्तेत आणि संपत्तीत भर पडली. आणि १७२२ मध्ये सुखाचा परमोच्च बिंदू गाठला. पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांच्या मुलीशी घोरपड्याचे चिरंजीव व्यंकटराव यांचा विवाह झाला. या संबंधामुळे इचलकरंजी अधिपतींना महत्व प्राप्त झाले. पेशव्यांची सहानुभूति व पाठिंबा याचा त्यांना भरवसा होता. त्यामुळेच इचलकरंजीकरांना कोल्हापूरच्या राजांकडूनही चांगली वागणुक दिली गेली. पेशवे व कोल्हापूरचे राजे यांच्यात वेळोवेळी ज्या संधी व करार झाले त्यामध्ये इचलकरंजी संस्थानास संरक्षण देण्याचा प्रयत्न पेशव्यांनी कोल्हापूरच्या राजासमोर केलेला दिसतो.[४]

इचलकरंजीच्या संस्थापकाचे व्यक्तिमत्व दखलपात्र होते. इतिहासकार ए.जी.फ्रँक म्हणतात, "इचलकरंजी राज्याचे संस्थापक नारोपंत हा विशेष गुणवत्तेचा, मोठ्या मनाचा आणि उत्साही, करारी, विश्वासु, धोरणी आणि मुत्सद्दी होता. असहाय्य असल्यामुळे त्याने बहिरेवाडीला सैन्यात प्रवेश केला. परंतु पहिल्या रांगेतील एक सरदार म्हणून मृत्यू पावला.[५]

कोल्हापूर संस्थानात एकूण अकरा जहागी-या होत्या. त्यापैकी इचलकरंजी, विशाळगड, बावडा आणि कागल या महत्वाच्या जहागि-या

होत्या. इचलकरंजीच्या अधिपतीमहत्व पुढीलप्रमाणे होते. ते ब्रिटीशांच्या शासनातील पहिल्या वर्गातील सरदार होते. जहागिरीमध्ये व नंतर त्यांना शासनातील प्रमुख व्यक्तींची भेट घेण्याची परवानगी मिळाली होती.[६]

श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांनी १८९२ मध्ये अधिकार-सूत्रे ग्रहण केली.[७] त्यांनी आपल्या कारकिर्दीत अत्यंत योजनाबध्द कारभार करून अनेक शैक्षणिक, सामाजिक व औद्योगिक संस्था स्थापन केल्या. त्यांना सतत सक्रिय प्रोत्साहन देऊन त्या नांवारुपास आणल्या. इचलकरंजीचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. द्रष्टेपणाने त्यांनी ज्या अनेक योजना साकारल्या त्यातूनच इचलकरंजीच्या हातमाग व यंत्रमागाच्या धंद्याचा उगम झाला.[८]

इचलकरंजीत त्या काळात फक्त शेती व्यवसाय अस्तित्वात होता. शेतीचा व्यवसाय जेमतेम उदरनिर्वाहापुरताच उपयोगी पडे. आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी दुसरे कांही मार्ग दाखविणे आवश्यक होते. बाबासाहेबांचे प्रारंभीचे मार्गदर्शक न्यायमूर्ति रानडे प्रभृतींनी असे सांगितले होते की, "बाहेरचा पैसा घरीआल्यावाचून आर्थिक संपन्नता येऊ शकत नाही"[९]

बाहेरील पैसा या गांवात आला पाहिजे या धोरणाने अनेक कोष्टी, साळी वगैरे पिढीजात हातमागावर"लुगडी"विणण्याचा व्यवसाय करणारी कसबी कुटुंबे रबकवी, बुधगांव व कर्नाटकातील इतर खेडयातून इकडे आणली. त्यांना जागा, पाणी, भांडवल व कर विषयक सवलती उपलब्ध करून दिल्या. समर्थ राजाश्रय लाभल्यामुळे विणकामाचा धंदा जोमाने सुरु झाला.[१०]

या कोष्टी कुटुंबांनी हातमागावर खादीची जाड पाटगी काढून आसपासच्या बाजारात विकायला नेली. ती झटपट खपू लागली. भावही बरा येऊ लागला. इचलकरंजीची पाटगी, कुणबाऊ सुताडे यांचे कापड-बाजारात नांव झाले. बाबासाहेबांचा हा प्रयोग सफल होऊन इचलकरंजीच्या मालाचे बाहेरही नांव झाले.[११] इचलकरंजीचा विणकर व्यवसाय नंतर अमर्याद भरभराटीला आला. हातमागावर इचलकरंजी सुती साडयांचे उत्पादन होत असे. आणि त्या साडयादेखील सर्वत्र खपू लागल्या.

कोष्टी लोकांच्या हातमागावर भिस्त ठेवून आर्थिक भरभराट झपाटयाने होणे शक्य नव्हते. त्यासाठी दुसरे मोठे प्रयत्न होणे जरूरीचे होते. कांही कल्पक, कुशल व साहसी कारखानदारांनी या हातमागाला यांत्रिक सहाय्य घेऊन "यंत्रमाग" या वस्त्रनिर्मितीच्या एका क्रांतीकारक यंत्रयुगाची सुरुवात या उद्योग नगरीत केली. असा पहिला यंत्रमाग १९०४ मध्ये विठ्ठलराव दातारांनी घातला.[१२] इचलकरंजीला यंत्रमागाची गंगोत्री म्हणतात. कारण कै.दातारांनी भारतीय यंत्रमाग धंदयाची सुरुवात केली. त्यानंतरच भारतात यंत्रमाग धंदा सुरु झाला असे म्हणतात.[१३]

अशा यंत्रमागावर ग्राहकांची आवड निवड व मध्यम वर्गीयांची बदलत चाललेली फॅशन लक्षात घेऊन निरनिराळ्या रंगसंगतीच्या साडयांचे नवीन उत्पादन सुरु झाले. हातमागापेक्षा यंत्रमाग व्यवसाय सुलभ असल्याने हातमागाबरोबरच यंत्रमागावरही साडयांचे उत्पादन वाढू लागले. त्यामुळे दिवसेंदिवस यंत्रमागांची संख्या नैसर्गिकरित्या वाढू लागली व त्याप्रमाणाने हातमाग मागे पडू लागले. यंत्रमागाचा धंदा किफायतशीर होऊ लागल्याने अनेक हातमाग कारखानदारांनी त्याचे रुपांतर यंत्रमागामध्ये केले व त्याच-

प्रमाणे तो धंदा त्यानंतरच्या काळात फक्त कोष्टी किंवा साळी या पिढीजात विणकरांपुरता मर्यादित न राहता सर्व जातीचे व धर्माचे लोक या यंत्रमाग धंद्यात उतरले. म्हणून १९०४ साली अवघ्या एका यंत्रमागाने चालू झालेला हा धंदा १९५० सालापर्यंत २००० यंत्रमागावर येऊन ठेपला.[१४]

१९०४ ते १९५० याच काळात श्री. दातार, मराठे, सांगले, बुगड, व कांबळे यांनी वस्त्रोद्योग व्यवसायात पदार्पण केले आणि यंत्रमागावर साडीचे उत्पादन घेण्यास सुरुवात केली. हातमागाच्या तुलनेत यंत्रमागावरील उत्पादन जास्त येत असल्याने व ते किफायतशीर होऊ लागल्याने यंत्रमाग व्यवसायाने इचलकरंजीत चांगलेच मूळ धरले. तथापि भारतीय स्वातंत्र्यापर्यंत ह्या धंद्याची म्हणावी तशी वाढ झाली नव्हती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र शासनाने कुटीरोद्योग या सदराखाली विकेंद्रित क्षेत्रातील यंत्रमागाला प्रोत्साहन दिल्यामुळे महाराष्ट्रात भिवंडी, मालेगांव, इचलकरंजी ही यंत्रमागाची महत्त्वपूर्ण केंद्रे निर्माण झाली.[१५]

१९५० पर्यंत यंत्रमाग उद्योग सुव्यवस्थित होता. पण त्यानंतर यंत्रमाग धंद्यावर एक संकट आले. केंद्र सरकारने हातमाग धंद्यास संरक्षण देण्याच्या भूमिकेने यंत्रमागावर साड्या विणण्यास कायमची बंदी घातली. परिणामत: अनेक यंत्रमाग बंद पडले. त्यातच १९५० ते १९५२ अखेर एका फार मोठ्या मंदीच्या फेऱ्यात हा यंत्रमागाचा धंदा सापडला. तयार मालात भांडवल अडकून पडले. पण त्याहीपेक्षा अशा मागावर आता कोणते उत्पादन घ्यावे ही समस्या निर्माण झाली होती.[१६]

१८ मे १९५५ मध्ये यंत्रमागावर अबकारी कर बसविला. व या धंद्यामध्ये

अनेक नविन प्रश्न निर्माण झाले. बहुसंख्य यंत्रमागधारकांनी साडीच्या उत्पादनाचा ढाचा बदलून सफेद को-या मालाचे विशेषत: धोती व मलमलचे उत्पादन हाती घेतले. या बदलत्या उत्पादनास योग्य असे साईज्ड बिमावरील सूत बाजारात मिळू लागले. यातच सरकारने कांपोझीट गिरण्यावर त्यांच्या धोती व मलमलच्या एकूण उत्पादनात ४०% कपातीचे निर्बंध घातले. त्यामुळे धोती व मलमलच्या उत्पादनाचे क्षेत्र विकेंद्रित क्षेत्रातील यंत्रमागधारकांना उपलब्ध झाले. अबकारी कराचे प्रमाण दरवर्षी वाढू लागले. मध्यंतरीच्या काळात कांपोझीट गिरण्यांवर लादलेली ४०% ची कपात रद्द केली गेली. या गिरण्यांकडून यंत्रमागाला होणारा सुताचा पुरवठा अनियमित व अपुरा तर होऊ लागलाच पण जादा दाम देऊनही सुताची चांगली क्वालिटी मिळेनाशी झाली. इचलकरंजीला सुताचा पुरवठा सर्वस्वी मुंबई, कोईमतूर, अहमदाबाद येथून होत असे. सुताचे एजंटस, दलाल, पेढया या परिस्थितीचा गैरफायदा उठवून छोटया यंत्रमागधारकांची अडवणूक व पिळवणूक करीत होते. या परिस्थितीवर तोडगा म्हणून इचलकरंजीत एक सूत गिरणी चालू करण्याचा व ती सहकारी तत्वावर चालविण्याचा नवा विचार पुढे आला.[१७]

१९५० च्या जवळपास १२००० चात्यांची गिरणी ही इकॉनॉमिक युनिट म्हणून ऑल इंडिया हॅंडलूम बोर्डाने केलेल्या शिफारसीप्रमाणे हातमाग धंदास पोषक असे परवाने देण्याची केंद्र शासनाने घोषणा केली. तेंव्हापासून दक्षिण महाराष्ट्रात असा एक परवाना इकडील हातमाग व यंत्रमाग धंदा-करिता मिळावा अशी खटपट दक्षिण महाराष्ट्र कारखानदार संघाच्या वतीने चालविली होती. सांगली जिल्ह्याकरिता असा एक परवाना मिळविला होता. परंतु ५०-६० लाखाचा हा प्रकल्प उभारणे हातमाग विणकरांच्या

आर्थिक कुवतीच्या बाहेर होते. तसेच या योजनेचा बहुतांशी लाभ हातमाग विणकरांना मिळणार होता. त्यामुळे यंत्रमागधारकांना त्यात फारसे स्वारस्य नव्हते. हातमागाच्या या स्कीमप्रमाणेच निव्वळ यंत्रमागाकरितां २५ हजार चात्यांचे एक युनिट इचलकरंजी करिता मंजूर व्हावे अशी खटपट इचलकरंजी पॉवरलूम विव्हर्स को-ऑपरेटिव्ह असोसिएशनकडून चालू होती. तथापि निव्वळ यंत्रमागाकरितां शासनाकडे कोणतीच योजना उपलब्ध नसल्याने या खटपटीस यश येत नव्हते. राज्य सरकारने नेमलेल्या "पॉवरलूम इन्क्वायरी कमिटीने" पॉवरलूम हा टेक्स्टाईल धंद्यातील एक स्वतंत्र घटक असून महाराष्ट्रातील ग्रामिण रोजंदारीचा प्रमुख आधारस्तंभ असल्याचे आपल्या अहवालात नमूद करुन राज्य सरकारने हातमाग व यंत्रमाग असलेल्या ठिकाणी सहकारी पद्धतीची प्रोसेस हाऊस व सूत गिरणी स्थापन करणेची शिफारस केली. मे १९६० मध्ये स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि कै.यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली नवमहाराष्ट्र संघटित होऊ लागला. सहकाराची क्षितीजे रुंदाऊ लागली. इचलकरंजीतील कार्यकर्त्यांच्या सहकारी सूत गिरणी स्थापन करण्याच्या कल्पनेने पुन्हा एकदा उचल खाल्ली. कार्यकर्त्यांची जिद्द व तळमळ पाहून त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनीही कल्पना उचलून धरली. व ती साकारण्यासाठी सर्वतोपरी सहाय्य केले. डिसेंबर १९६० मध्ये दि डेक्कन को-ऑप.स्पिनिंग मिल्स लि., इचलकरंजी या संस्थेची स्थापना झाली. १९६२ मध्ये त्यावेळचे राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या शुभहस्ते डेक्कन सूत गिरणी कार्यान्वित झाली. ख-या अर्थाने महाराष्ट्रात व देशात सहकारी सूत गिरणीचा पाया डेक्कननेच रोवला असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही.[१८]

१८ मे १९५५ पासून यंत्रमागावर केंद्र सरकारचा अबकारी कर बसविला गेला. या अबकारी करात रास्त सवलती मिळविण्यासाठी यंत्रमागधारकांना प्रदीर्घ लढा द्यावा लागला, व अशोक मेहता कमीटीच्या शिफारसी १९६४ साली सरकारने स्विकारल्यामुळे यंत्रमागावरील अबकारी कराचे प्रमाण कांही शास्त्रीय कसोटीवर ठरु लागले. अशा बिकट परिस्थितीतही यंत्रमागांची संख्या दिवसेंदिवस वाढत जाऊन १९७५-७६ या सालामध्ये ती २० हजार पेक्षा जास्त झाली. सायझींगची संख्या या काळात ६० होती. यानंतर या वस्त्रोद्योगातील एक महत्वाची गरज म्हणजे कोऱ्या मालावर प्रक्रिया करण्याचे साधन उपलब्ध करणे. या काळात अनेक प्रोसेसिंग संस्थांची स्थापना करण्यात आली.[९]

तक्ता क्र. १

यंत्रमाग उद्योगाची वाढ दाखविणारा तक्ता

| वर्ष | | यंत्रमागांची संख्या |
|---|---|---|
| १९५०-१९५१ | .. | २,००० |
| १९५५-१९५६ | .. | ५,००० |
| १९६०-१९६१ | .. | ८,००० |
| १९६५-१९६६ | .. | १२,००० |
| १९७०-१९७१ | .. | १५,००० |
| १९७५-१९७६ | .. | २०,००० |
| १९८०-१९८१ | .. | ३२,००० |
| १९८१-१९८२ | .. | ४२,००० |
| १९८२-१९८३ | .. | ४५,००० |
| १९८३-१९८४ | .. | ५०,००० |
| १९८४-१९८५ | .. | ५२,००० |
| १९८६-१९८७ | .. | ६०,००० |

[इचलकरंजी पॉवरलूम असोसिएशन च्या ऑफिसमधून].

ऑगस्ट १९६४ मध्ये विणकर व कापूस उत्पादक यांची संयुक्त अशी कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सूत गिरणी रत्नाप्पा कुंभार यांच्या पुढाकाराने स्थापन झाली. सहकार महर्षि दत्ताजीराव कदम यांच्या प्रेरणेने आणि कल्लाप्पा आवाडे यांच्या पुढाकाराने जून १९७४ मध्ये दि इचलकरंजी को-ऑप. स्पिनिंग मिल्स लि., इचलकरंजी ही यंत्रमागधारकांची सूत गिरणी स्थापन झाली.[२०]

या शहरातील वस्त्रोद्योगाची प्रचंड वाढ झाल्याने अनेक राजस्थानी मारवाडी व इतर कमीशन एजन्सीचा धंदा करणा-या लहान मोठया पेढया १९६६ ते ७६ या काळात २०० पर्यंत स्थापन झाल्या. परंतु त्याबरोबरच या पेढयांतून "सुप्त मक्तेदारी" या धंदात उत्पन्न झाली होती. तिला आवर घालण्याच्या दृष्टीने व छोटया यंत्रमागधारकाला त्याच्या श्रमाचा पूर्ण लाभ करुन देण्याच्या दृष्टीने "दि महाराष्ट्र स्टेट पॉवरलूम्स कार्पोरेशन लि., मुंबई" ही संस्था स्थापन झाली.[२१]

६ जून १९८५ रोजी नवीन वस्त्रोद्योग धोरण जाहीर झाले. हे धोरण कोणाचेच समाधान करु शकले नाही. त्यामुळे भारत सरकारने त्या धोरणा-संबंधी पुनर्विचार करण्याकरिता समिती नेमली. या धोरणानुसार वास्तविक कापड गिरण्यांना अनुकूल परिस्थिती निर्माण व्हावयास हवी होती. कापड गिरण्यांच्या प्रवक्त्यांच्या मागण्यांना सरकारने संमती दिल्यासारखे या नव्या धोरणात दिसत होते.[२२]

वस्त्रोद्योग धोरणात उद्योगाच्या आधुनिकीकरणावर भर देण्यांत आला होता. कापड गिरण्यांना नवीन यंत्रमाग बसविण्यास परवानगी दिलेली होती. गिरण्यांवर कोणताही धागा वापरता येऊ लागला. यातील

मतभेदाचा मुद्दा हा होता की, कापड गिरण्यांनायुनिट बंद करण्याबाबत पूर्ण स्वातंत्र्य दिलेले होते. याबरोबरच हातमागाविषयी सरकारने अनेक तरतुदी केल्या व यंत्रमागावर'जनता कापड'काढण्यास बंदी घातली. यामुळे राजकीय नेते, कामगार व यंत्रमागधारक या सर्वांनीच या धोरणाला विरोध केला.[२३]

१९८६ मध्ये नवमहाराष्ट्र सहकारी सूत गिरणी २५ हजार चात्यांवर सुरू झाली. कोल्हापूर जिल्ह्यात २२ सहकारी सूत गिरण्या रजिस्टर झाल्या असून त्यातील फक्त डेक्कन, शेतकरी, आयेको व नवमहाराष्ट्र या इचलकरंजीतील चारच सूत गिरण्या चालू झाल्या आहेत. महाराष्ट्रातील इतर सूत गिरण्यांमध्ये या सूत गिरण्या आघाडीवर आहेत.[२४]

यंत्रमाग धंद्यात उत्पादनाबाबतची लवचिकता आली. त्यामुळे अलिकडच्या काळात इचलकरंजीमध्ये सूती कापडाबरोबरच, ब्लेंड व सिंथेटिक व सुटींग तयार होऊ लागले आहे. इचलकरंजीत अशाप्रकारचे उत्पादन ३३% आहे.[२५]

आजच्या स्थितीचा विचार करता गेल्या तीस वर्षात [१९५७ ते १९८७] वस्त्रोद्योगात जर कोणते प्रमुख संक्रमण झाले असेल तर ते म्हणजे ३० वर्षापूर्वी कापड उत्पादनापैकी ७५% कापड मोठ्या शहरातील कापड गिरण्यातून तयार होत असे व २५% कापड हातमाग व यंत्रमाग यावर तयार होत असे. या तीस वर्षात हे चित्र संपूर्ण उलटे झाले असून आता ७५% कापड यंत्रमाग व हातमागावर तयार होते. तर २५% कापड कापड गिरण्यांतून तयार होते. मुंबई, अहमदाबाद पुरता केंद्रित असलेला हा वस्त्रोद्योग आता भारतभर पसरला आहे. विशेषत: पश्चिम भारत व दक्षिण भारत या भागात वस्त्रोद्योग विखुरला गेला आहे. त्यातही परत महाराष्ट्र, गुजराथ व तामिळनाडू या

राज्यात तो जास्त प्रमाणात आहे.[२६]

इचलकरंजीच्या यंत्रमाग उद्योगाच्या वाढीबरोबर येथील वस्त्रोद्योगाला पूरक असणा-या संस्थांची संख्यादेखील वाढली. आज इचलकरंजीमध्ये जवळजवळ ९ पॉवर प्रोसेसर्स, ८० हँड प्रोसेसर्स, १७५ सायझींग कारखाने असलेले दिसतात. यंत्रमागावर आधारित उद्योगाची वाढ इचलकरंजीमध्ये झाली. त्याचबरोबर यंत्रमागाचे उत्पादन करणारे कारखाने येथे सुरु झाले आहेत.

-=0=-

## -: संदर्भ सूचि :-


| | | | |
|---|---|---|---|
| १. | कॅम्पबेल जे.एम्. | – | बॉम्बे गॅझिटर<br>रिवाईज्ड एडीशन, बॉम्बे १९६०<br>पृष्ठ क्रमांक ८४०. |
| २. | प्रा.राजगे ए.बी. | – | "इचलकरंजीतील विकेंद्रित यंत्रमाग उद्योगाच्या समस्या आणि उपाय"<br>पृष्ठ क्रमांक २६. प्रबंध १९८८. |
| ३. | ताम्हणकर ना.धों. | – | "श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे चरित्र"<br>पृष्ठ क्रमांक ६४. |
| ४. | गॅझिटर ऑफ इंडिया | – | उपरोक्त, पृष्ठ क्रमांक ८४. |
| ५. | फ्रॅंक्स एच्.जी. | – | "द स्टोरी ऑफ इचलकरंजी."<br>पृष्ठ क्रमांक २९. |
| ६. | गॅझिटर ऑफ इंडिया | – | उपरोक्त, पृष्ठ क्र. ९४. |
| ७. | ताम्हणकर ना.धों. | – | उपरोक्त, पृष्ठ क्र. ६४ |
| ८. | "ऐसी अक्षरे" | – | स्मरणिका १९७६<br>"अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन." – पृष्ठ क्रमांक ९३. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | ताम्हणकर ना.धों. | – | उपरोक्त, पृष्ठ क्र.८१. |
| १०. | "ऐसी अक्षरे" | – | उपरोक्त, पृष्ठ क्र.९३ |
| ११. | ताम्हणकर ना.धों. | – | उपरोक्त, पृष्ठ क्र.८२. |
| १२. | "ऐसी अक्षरे" | – | उपरोक्त, पृष्ठ क्र.९३. |
| १३. | दि.बा.आजगांवकर | – | "बीजमाग उद्योगाला उपयुक्त संस्था हवी". लेख – दै.सकाळ दि.२७ जून १९८८. |
| १४. | "ऐसी अक्षरे" | – | उपरोक्त, पृष्ठ क्र.९३. |
| १५. | श्री.गजाननराव कांबळे | – | "कथा एका गॅविस्टरची" लेख – नूतन वास्तु विशेष पुरवणी दै.सकाळ दि.८ जून १९८८ |
| १६. | "ऐसी अक्षरे" | – | उपरोक्त, पृष्ठ क्र.९३ |
| १७. | श्री.गजाननराव कांबळे | – | उपरोक्त, पृष्ठ क्र.१ |
| १८. | श्री.गजाननराव कांबळे | – | उपरोक्त, पृष्ठ क्र.१ |
| १९. | "ऐसी अक्षरे" | – | उपरोक्त, पृष्ठ क्र.९५ |
| २०. | श्री.गजाननराव कांबळे | – | उपरोक्त, पृष्ठ क्र.४ |
| २१. | "ऐसी अक्षरे" | – | उपरोक्त, पृष्ठ क्र.९५ |
| २२. | दि.बा.आजगांवकर | – | लेख – "बीजमाग उद्योजकाचे भवितव्य" –दै.सकाळ –दि.२५ जून १९८८ |

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

| | | | |
|---|---|---|---|
| २३. | दि.बा.आजगावकर | – | उपरोक्त, |
| २४. | श्री.गजाननराव कांबळे | – | "कथा एका मॅंचेस्टरची"<br>उपरोक्त. |
| २५. | दि.बा.आजगांवकर | – | "वीजमाग उद्योगाला उपयुक्त संस्था हवी"<br>लेख – दै.सकाळ दि.२७ जून १९८८. |
| २६. | दि.बा.आजगांवकर | – | "वीजमाग उद्योगाचे भवितव्य"<br>लेख – दै.सकाळ दि.२५ जून १९८८ |

-=0=-